सेवा निलंबन कालावधीचा निर्णय घेणे बाबत.
(श्री.राजु बापू नाटके तत्कालीन सक्तीने सेवानिवृत्त ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती कर्जत ग्रामपंचायत थेरवाडी)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आदेश ग्रामपंचायत विभाग-ग्रांप -३ ई.क्र ९२०५४६८
दिनांक १८/११/२०२५

**संदर्भ**- १.या कार्यालयाचे आदेश क्रमांक साप्रवि-२/ग्रापं-३/क्र.८८६/२०१९ दिनांक २४/०९/२०१९ (सक्तीने सेवानिवृत्त करणे आदेश)
२.या कार्यालयाची नोटीस क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/क्र.८७१/२०२३ दिनांक १६/११/२०२३ दिनांक २० /०८/२०२४ (सेवा निलंबन कालावधीच्या निर्णया बाबत)
३.गट विकास अधिकारी श्रीरामपुर यांचे पत्र जा.क्र./आस्था२/५४८/श्रीरामपूर दि.१०/०६/२०२५

संदर्भ क्रमांक ०१ अन्वये श्री. राजु बापू नाटके सेवानिवृत्त तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रांमपंचायत थेरवाडी पंचायत समिती कर्जत यांना दिनांक १०/०८/१९९८ ते ०७/०४/२००३ अखेरचा सेवा निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व कारणांसाठी कामावर <u>व्यतीत न केलेला कालावधी</u> म्हणून का समजणेत येऊ नये? या बाबतची नोटीस देण्यात आलेली आहे.

संदर्भ क्रमांक ०३ अन्वये श्री.राजु बापू नाटके सक्तीने सेवानिवृत्त ग्रामपंचायत अधिकारी यांना दिनांक ०७/१२/२०२३ रोजी सदरची नोटीस बजावण्यात आलेली असल्याचे गटविकास अधिकारी यांनी त्यांचे पत्रात नमूद केलेले आहे.श्री.नाटके यांचा ६० दिवसात खुलासा सादर करण्याचा कालावधी संपुन बराच कालावधी झालेला असल्याचे कळवून सदर कालावधीचा निर्णय अदयाप न झाल्याने त्यांचे सेवानिवृत्ती प्रकरण प्रलंबीत असल्याने श्री.राजु बापू नाटके यांचे दि. १०/०८/१९९८ ते दि.०७/०४/२००३ अखेर १७०२ दिवसाचे सेवानिलंबन कालावधीचा निर्णय होणेस विनंती केलेली आहे.

श्री.राजु बापू नाटके तालुका श्रीरामपुर यांनी नोटीसचा खुलासा सादर केलेला नाही.सबब, महाराष्ट्र नागरी सेवा सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्तर सेवा निलंबन व बडतर्फ यांचे काळांतील प्रदाने) नियम १९८१ चा नियम ७२ चे (५) (७) मधील तरतूदीनुसार श्री.राजु बापू नाटके सेवानिवृत्त तत्कालीन ग्रांमपंचायत थेरवाडी पंचायत समिती कर्जत यांचा दिनांक १०/०८/१९९८ ते दिनांक ०७/०४/२००३ अखेरचा सेवा निलंबित कालावधी हा सेवेच्या सर्व कारणांसाठी कामावर व्यतित न केलेला कालावधी समजण्यात यावा. सदर आदेशाची नोंद संबधीताचे सेवा पुस्तकात घेण्यात यावी. सदरचा आदेश जिल्हा परिषदअहिल्यानगर www.~~ahmed~~nagarzp.gov.in चे संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक २०२५१११८०६०१६१ असा आहे.

**Signed by Anand Subhashlal Bhandari**
**Date: 18-11-2025 21:32:54**
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

**प्रति**- श्री. राजु बापू नाटके सेवानिवृत्त तत्कालीन ग्रांमपंचायत थेरवाडी पंचायत समिती कर्जत
**द्वारा** :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपुर,जि.अहिल्यानगर.
**प्रत** - गट विकास अधिकारी पंचायत समिती कर्जत/श्रीरामपुर पुढील कार्यवाहीसाठी .